**Indian Streams Research Journal**
**Volume 3, Issue. 1, Feb. 2013**
**ISSN:-2230-7850**
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# बुलडाणा अर्बन को-ऑप.क्रेडीट सोसायटी मर्या., अंतर्गत कर्मचारी विकास योजनांचे विश्लेषणात्मक अध्ययन

**डॉ. जयलक्ष्मी हेमराजसिंह बिनवार१ , डॉ. सौ. रेखा मिलिंद गुल्हाने[२]**
[१]संशोधनकर्ती , एम.कॉम. एम.ए.(अर्थशास्त्र) पी.एच.डी, डि.सी.एम.,जी.डी.सी. ॲण्ड ए.
[२]मार्गदर्शक , एम.कॉम.एम.ए., एम.फील, बी.एड, पी.एच.डी. नागपूर.

**साराशं**

प्रस्तुत अध्ययनात बुलडाणा अर्बन को-ऑप.क्रेडीट सोसायटीतील एकूण ५०० कर्मचारी लाभार्थी कडुन संकलीत करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले. संकलीत तथ्यांच्या विश्लेषणाकरीता विविध सांख्यिकीय पद्धतींचा वापर करण्यात आला.

यात प्रामुख्याने वारंवारीता व टक्केवारी तसेच विविध पर्यायांदरम्यान सार्थकता स्तर तपासण्याकरीता Non-Parametric Chi square test या सांख्यिकीय चाचणीचा वापर करण्यात आला विश्लेषित माहिती सारण्यांच्या स्वरूपात प्रस्तुत करण्यात आली व यावरून आलेख तयार करण्यात आले. संकलित केलेली माहिती विभागवार वर्गीकृत करण्यात आली. प्रत्येक सारणी खाली त्या सारणीतील माहितीचे स्पष्टीकरण देण्यात आले व स्पष्टीकरणाअंती परिणाम देखील प्रस्तुत करण्यात आले.

**प्रस्तावना**

सहकारीता ही मानवीय सभ्यतेचे एक अभिन्य अंग आहे. मनुष्यात पारस्पारिंक सहायता आणि पूर्ण पारस्पारिक निर्भयता सामाजिक जीवनाचे आवश्यक अंग झालेले आहे. संपूर्ण जैविक आणि मनोवैज्ञानिक शक्ती ज्यात मनुष्याची निर्मिती होऊन सामूहिक जीवनाकडे घेऊन जाते. आणि एकांतवासाला असंभव बनवून देते. याच मुळ तत्वाने आधुनिक सहकारी रिती सिद्धांन्ताचा क्रमशः विकास झालेला आहे. जे प्रति व शोषण करणाऱ्या क्षिण शक्तींना होणाऱ्या वैयक्तिक अडचणींना, बाधांचा पराभव करून या सामाजिक जीवनात मनुष्याचे गरीबीतून आणि श्रमाचा विनाश करण्याकरीता एक महत्वपूर्ण आर्थिक अस्त्र आहे. आज सहकारितेचा अध्ययनाशिवाय या जगात सामाजिक यथार्थाला समजणे कठिण आहे. काही देशात अर्थव्यवस्थेचे सहकारी स्वरूप प्रबळ आहे. भारतात सहकारिता मनुष्य जीवनात प्रत्येक

देशांत पसरलेली आहे. देशांत कृषी, औद्योगिक आणि वितरण अर्थव्यवस्थेत सहकारी, संघटनात अधिकाधिक व वैविध्यपूर्ण भूमिका पार पाडण्यास मागणी केली जात आहे.

बुलडाणा अर्बन पतसंस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष कार्यकारी संचालक व्यवस्थापक मंडळ कर्मचारी स्थानिक सल्लागार समिती प्रमुख व्यवस्थापक सहाय्यक व्यवस्थापक, विभागीय प्रमुख लेखा प्रमुख अंतर्गत लेखा परिक्षण प्रमुख, कर्ज अधिक्षक प्रमुख सभासद ग्राहक इत्यादींची बुलडाणा अर्बन प्रतिनिष्ठा आपुलकी आस्था, विश्वास फिनीक्सपक्षाप्रमाणे उपमा देण्यात आलेली आहे. बुलडाणा अर्बन पतसंस्थेच्या अध्यक्षांनी कर्मचारी असो वा विभाग प्रमुख असो यांची पकड त्यांनी अतिशय मार्मिक पद्धतीने केली आहे. ''प्रत्येक कुटुंबासाठी कुटुंबातील प्रत्येकासाठी बुलडाणा अर्बनच्या ब्रिद वाक्यांनी आज देशाला नव्हे तर जगाला दाखवून दिलेले आहे की, बुलडाणा अर्बन परीवाराचा प्रत्येक घटक हा जीवाला जीव लावून प्राणाला प्राण लावून अतिशय सुंदर पद्धतीने कामकाजात, स्वच्छता, पारदर्शकता, आर्थिक शिस्त, निटनेटकेपणा सेवाभावी भावना स्वत:ला कामात व सेवेत ओतून देणारा बुलडाणा अर्बनच्या परीवाराचा प्रत्येक कर्मचाऱ्यांनी फिनिक्स पक्षाप्रमाणे सहकारी चळवळीला हातभार लावून संजीवनी देण्याचे कार्य आज केलेले आहे. ''

महाराष्ट्रांतच नव्हे तर मध्यप्रदेश, छत्तीसगड, उत्तरप्रदेशात देखील उत्तम पद्धतीने सामाजिक बांधीलकी ठेवून प्रत्येक गावात, शहरात, भौगोलिक परिस्थितीनुसार नवीन शाखेची निर्मिती करुन सहकाराची बांधीलकी जनजागृतपणे करण्याचे कार्य बुलडाणा अर्बनच्या अध्यक्षांनी आज जगापुढे एक नवीन दिशा देण्याचे एक उत्कृष्ठ कार्य केले आहे. अध्यक्षांच्या विचारांना अनुसरुन जागतिकीकरणाच्या स्पर्धेत जर टिकायचे असेल तर सर्व सभासदांनी ग्राहकांनी, कर्मचाऱ्यांनी अधिकाऱ्यांनी एकत्र येवून, नवनवीन उद्योगधंदयांना, सहकाऱ्यांच्या तत्वांना अनुसरुन परिवाराप्रमाणे कार्य करावे, आपण बुलडाणा अर्बनचे नोकरवर्ग सभासद नसून आपण मालक आहोत अशी भावना ठेवून कार्य करावे. कर्मचाऱ्यांची

**१. बुलडाणा अर्बन को-ऑप.क्रेडीट सोसायटी मर्या., अंतर्गत विकास योजनांमुळे कर्मचाऱ्यांची आर्थिक प्रगती दर्शक सारणी.**

| **आर्थीक प्रगती** | **संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|
| पुर्णता सहमत | ११८ | २३.५ टक्के |
| सहमत | २०० | ४० टक्के |
| अनिश्चित | ९७ | १९.५ टक्के |
| टसहमत | ५७ | ११.५ टक्के |
| पुर्णता असहमत | २८ | ५.५ टक्के |
| एकुण | ५०० | १००.०० |
| **स्त्रोत : प्रश्नावली वरून** | | |

उपरोक्त सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकुण ५०० लाभार्थी पैकी २०० लाभार्थी हे वरील मंताशी सहमत आहे व त्यांची टक्केवारी ४० इतकी आहे. ११८ लाभार्थी हे वरील मंताशी पुर्णता सहमत आहे व त्यांची टक्केवारी २३.५ इतकी आहे. ९७ लाभार्थी हे वरील मंताशी अनिश्चित आहे व त्यांची टक्केवारी १९.५ इतकी आहे. परंतु ५७ लाभार्थी हे वरील मंताशी असहमत आहे व त्यांची टक्केवारी ११.५ इतकी आहे.

**बुलडाणा अर्बन को-ऑप.क्रेडीट सोसायटी मर्या., अंतर्गत कर्मचाऱ्यांची आर्थिक प्रगती झाली हे दर्शविणारी सारणी या विधानाला उत्तरदात्याद्वारे प्रदान करण्यात आलेली सरासरी गुण**

| N | Mean | SD | SE | Min | Max |
|---|---|---|---|---|---|
| 500 | 3.7 | 10.92 | 0.17 | 1 | 5 |
| N :- **संख्या**; Mean :- **मध्यमान**, SD :- **मानक विचलन**; SE :- **मानक तृटी**; Min :- **किमान**; Max :- **कमाल** | | | | | |

वरील सारणी प्रमाणे बुलडाणा अर्बन को-ऑप.क्रेडीट सोसायटी मर्या., अंतर्गत कर्मचाऱ्यांची आर्थिक प्रगती झाली आहे. या विधानाला उत्तरदात्यांद्वारे सरासरी ३.७ १०.९२ गुण प्रदान करण्यात आले. याचाच अर्थ असा की, बहुतांश उत्तरदाते या विधानासंबंधी अनिश्चित नाहीत म्हणजेच ते वरील विधानाशी सहमत आहेत.

यावरून बुलडाणा अर्बन को-ऑप.क्रेडीट सोसायटी मर्या., अंतर्गत कर्मचाऱ्यांची आर्थिक प्रगती झाली आहे

**२.बुलडाणा अर्बन को-ऑप.क्रेडीट सोसायटी मर्या., च्या कर्मचाऱ्यांची विकास योजनेसोबतच स्वयं रोजगारात वृद्धी दर्शक सारणी.**

| **स्वयं रोजगारात वृद्धी** | **संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|
| पुर्णता सहमत | ११३ | २२.५टक्के |
| सहमत | १७५ | ३५ टक्के |
| अनिश्चित | ११५ | २३ टक्के |
| टसहमत | ७० | १४ टक्के |
| पुर्णता असहमत | २७ | ५.५ टक्के |
| **एकुण** | ५०० | **१००.००** |

उपरोक्त सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकुण ५०० लाभार्थीपैकी १७५ लाभार्थी हे वरील मंताशी सहमत आहे व त्यांची टक्केवारी ३५ इतकी आहे. ११३ लाभार्थी हे वरील मंताशी पुर्णता सहमत आहे व त्यांची टक्केवारी २२.५ इतकी आहे. ११५ लाभार्थी हे वरील मंताशी अनिश्चित आहे व त्यांची टक्केवारी २३ इतकी आहे. परंतु ७० लाभार्थी हे वरील मंताशी असहमत आहे व त्यांची टक्केवारी १४ इतकी आहे.

**बुलडाणा अर्बन को-ऑप.क्रेडीट सोसायटी मर्या., च्या कर्मचाऱ्यांची विकास योजनेसोबतच स्वयं रोजगारात वृद्धी झाली आहे. या विधान बाबत उत्तरदात्यांद्वारे प्रदान करण्यात आलेले सरासरी गुण**

| N | Mean | SD | SE | Min | Max |
|---|---|---|---|---|---|
| 500 | 3.6 | ±1.01 | 0.21 | 1 | 5 |
| N :- संख्या; Mean :- मध्यमान, SD :- मानक विचलन; SE :- मानक तृटी; Min :- किमान; Max :- कमाल | | | | | |

वरील सारणी प्रमाणे बुलडाणा अर्बन को-ऑप.क्रेडीट सोसायटी मर्या., च्या कर्मचाऱ्यांची विकास योजनेसोबतच स्वयं रोजगारात वृद्धी झाली आहे. या विधानाला उत्तरदात्यांद्वारे सरासरी ३.६ ± १.०१ गुण प्रदान करण्यात आले. म्हणजेच बहुतांश उत्तरदाते या विधानाबाबत अनिश्चित नाहीत याचाच अर्थ असा बहुतांश उत्तरदाते वरील विधानात सहमत आहेत.

या सारणीतील माहिती वरून बुलडाणा अर्बन को-ऑप.क्रेडीट सोसायटी मर्या., च्या कर्मचाऱ्यांची विकास योजनेसोबतच स्वयं रोजगारात वृद्धी झाली आहे.

## निष्कर्ष

- ❖ बुलडाणा अर्बन को-ऑप.क्रेडीट सोसायटीने कर्मचाऱ्यांची विकास योजना अंतर्गत अर्थसहाय्य उपलब्ध करून दिल्यामुळे लोकांना उत्पन्न मिळून आर्थिक मदत मिळाली.
- ❖ कर्मचाऱ्यांची विकास योजना अंतर्गत ग्रामीण भागात जीवनमानाचा स्तर उंचविण्याच्या साधनांचा वापर लाभार्थी करीत आहेत. ही साधने विकास योजना लाभ घेण्याआधी नव्हती म्हणजेच ती साधने विकास योजना लाभ घेतल्यानंतर घेतला गेली. याचा अर्थ लाभार्थीचे जीवनमान उंचावले.

## संदर्भ ग्रंथसूची


१) आवाळे मनोज, (२००३) पंचायत राज - कार्य- कायदा- योजना, अनुबंध प्रकाशन, पुणे.

२) आशीर्वादम ए. डी. आणि मिश्र कृष्णकांत, (२००२) राजनीती विज्ञान, एस. चन्द एण्ड कम्पनी लि. नवी दिल्ली.

३) ॲगर दर्बट, ‘पेरिल्स ऑफ डेमॉक्रसी’, (अनु.) सुराणा पन्नालाल : ‘लोकशाहीचे धोके, १९६७. कोल जी. डी. एच., (१९९३) लोकल ॲण्ड रिजनल गव्हर्नमेंट, मॅकमिलन पब्लिशींग कम्पनी, न्यूयार्क

४) क्ये-जॉन, (१९६६) द अडमिनिस्ट्रेशन ऑफ द इस्ट इंडिया कम्पनी, इलाहाबाद.

५) कऱ्हाडे, बी. एम. (२०११) शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापूरे ॲन्ड कं. पब्लिशर, नागपूर.

६) कटारिया सुरेंद्र, (२००७) ‘पंचायत राज संस्थाए’, नेशनल पब्लिशिंग हाऊस, जयपूर, प्रथम संस्करण.

७) गोएल अरूणा, (२००३) एज्युकेशन ॲण्ड सोशिओ ऍकानामिक परस्पेक्टीव्हस ऑफ वूमन डेवलपमेंट ॲण्ड एम्पावरमेंट, दीप ॲण्ड दीप पब्लीकेशन्स, न्यू दिल्ली.

८) गोखले रामचंद्र महादेव, (१९७१) 'नागरिकशास्त्र व भारतीय राज्यपद्धती', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, आठवी आवृत्ती.

९) चोपडा, सरोज, बाला, (१९९३) प्राचीन मध्य व आधुनिक भारत स्थानिक शासन, राजस्थान हिंदी अकादमी, जयपूर.

१०) देवगांवकर श. गो. (२००७) पंचायत राज आणि सामुहिक विकास, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

११) दास्ताने संतोष, (२००४) महाराष्ट्र २००४, रामचंद्र दास्ताने आणि कम्पनी, पुणे.